महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहिरात क्र. ०४/२०१९, जाहिरात क्र. ०५/२०१९, जाहिरात क्र. ०६/२०१९ व अंतर्गत अधिसूचना क्र. ०१/२०१९ करीताचे प्रसिध्दीपत्रक

१. महावितरण जाहिरात क्र. ०४/२०१९, जाहिरात क्र. ०५/२०१९, जाहिरात क्र. ०६/२०१९ व अंतर्गत अधिसूचना क्र. ०१/२०१९ नुसार अनुक्रमे "विद्युत सहाय्यक", "उपकेंद्र सहाय्यक" व पदविकाधारक/ पदवीधारक शिकाऊ अभियंता (वितरण/स्थापत्य) या पदांकरीता सन २०१९ मध्ये जाहिराती प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

२. उपरोक्त जाहिरातीमध्ये एस.ई.बी.सी. प्रवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले होते. सदर एस.ई.बी.सी. प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०९/०९/२०२० रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २३/१२/२०२० अन्वये एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या अथवा ई.डब्ल्यू.एस. घटकांचे लाभ घेणे **ऐच्छिक करण्यात आले होते.** जे उमेदवार खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. विकल्प स्विकारणार नाहीत ते एस.ई.बी.सी. प्रवर्गामध्येच गणण्यात येणार होते.

३. त्यानुसार एस.ई.बी.सी. प्रवर्गातून अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गाचा विकल्प स्वीकारण्यासाठी URL Link कंपनीच्या संकेतस्थळावर दि. १८/०२/२०२१ पासून दि. २०/०३/२०२१ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर बाब ऐच्छिक असल्याने काही उमेदवारांनी त्यांचे विकल्प सादर केलेले नाहीत.

४. तदनंतर शासन निर्णय दि. ३१/०५/२०२१ अन्वये अराखीव उमेदवारांकरीता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरीता १०% जागा आरक्षित करण्याबाबत मार्गदर्शन सूचना पारित झालेल्या आहेत. त्यानुसार **जाहिरातीमधील एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.) प्रवर्गातून पात्र असल्यास त्यांना ई.डब्ल्यू.एस. आरक्षणाचा लाभ घेता येईल. त्यानुसार एस.ई.बी.सी. प्रवर्गातून अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांना खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. आरक्षण यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे याकरीता विकल्प स्वीकारणे आवश्यक व गरजेचे असल्याने याबाबत स्वीकारावयाच्या विकल्पाकरीता URL Link कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

५. **सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अर्ज दाखल केलेले बहुतांश उमेदवार खेडया-पाडयात राहात असल्यामुळे तसेच सध्याची कोविड -१९ महामारीच्या परिस्थितीमुळे उपलब्ध सेवा सुविधांच्या अनुषंगाने उमेदवारांना विकल्प सादर करणेकरीता पुरेसा वेळ मिळावा म्हणून सदरची URL Link दि. ०९/०६/२०२१ पासून दि. १८/०६/२०२१ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

६. एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांनी यापूर्वी खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गाचा विकल्प सादर केला आहे, अशा उमेदवारांना पुन्हा विकल्प स्वीकारण्यास संधी देण्यात येत आहे. तसेच ज्या एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांनी दि. १८/०२/२०२१ पासून दि. २०/०३/२०२१ या कालावधीत खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गाचा विकल्प स्वीकारलेला आहे आणि आता त्यामध्ये बदल करावयाचा नसेल, अशा उमेदवारांचा स्वीकारलेला विकल्प अबाधित राहील.

७. ज्या एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांनी खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. यापैकी कोणताही विकल्प स्वीकारलेला नाही अशा उमेदवारांना विकल्प स्वीकारणे आवश्यक राहील. तथापि, खुल्या प्रवर्गातून विकल्प स्वीकारताना खुल्या प्रवर्गासाठी जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

८. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे (ई.डब्ल्यू.एस.) लाभ घेऊ इच्छिणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातील उमेदवारांना याबाबतचे महाराष्ट्र शासन दि. ३१/०५/२०२१ मध्ये विहित केलेले प्रमाणपत्र सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन सादर करणे आवश्यक राहील.

९. जाहिरात क्र. ०६/२०१९ व ०१/२०१९ (अंतर्गत अधिसूचना) करीता खुल्या प्रवर्गातून भरती प्रक्रियेत समाविष्ट होणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातील उमेदवारांनी, खुल्या प्रवर्गासाठी विकल्प स्वीकारल्यास खुल्या प्रवर्गासाठी असलेली परीक्षा शुल्क, आवश्यक फरकाची रक्कम/फी शुल्क भरणे आवश्यक राहील. सदरची शुल्क भरण्यासाठी URL Link कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१०. **यापूर्वी, सदर भरती प्रक्रियेबाबत महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क.२५/ऊर्जा-२, दि. १०/०२/२०२१ तसेच वीज वितरण कंपनीने दिनांक ११.०२.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या सूचनांबाबत व कार्यवाहीच्या अनुषंगाने काही ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गातील उमेदवारांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ५१९६/२०२१ दाखल केली आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दि. १५/०३/२०२१ रोजी आदेश पारित केलेला असून सदर भरती प्रक्रियेस तुर्त स्थगिती दिलेली आहे. महावितरण कंपनीने तसेच महाराष्ट्र शासनाकडून देखील सुनावणी लवकर घेणेबाबत मा. न्यायालयास वेळोवेळी विनंती केलेली आहे. तथापि, मा. न्यायालयाने सदर सुनावणी नियमित न्यायालयीन सत्र सुरु झालेनंतर माहे जून २०२१ मध्ये घेण्यात येईल, असे कळविले आहे. सदर भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी महावितरण कंपनी सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. या प्रकरणी होणारी प्रगती तसेच न्यायालयाचा होणारा निर्णय कंपनीच्या संकेत स्थळावर वेळोवेळी निर्गमित केला जाईल.**

११. उपरोक्त भरती प्रक्रिया मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेली याचिका क्र. ९७६०९/२०२०, क्र. ५१९६/२०२१ व विविध न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या संलग्न/इतर याचिकांच्या अंतरिम/अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

**दिनांक : ०८/०६/२०२१**

**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**